बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. 242

# नोटीस

दि.०८/०२/२०२४

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४ महाडीबीटी पोर्टलवरून डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाहभत्ता योजनेकरिता विद्यार्थ्यांना देय रक्कमेत वाढ केलेबाबत.

संदर्भ -उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचा शासन निर्णय क्र. पनियो-२०२२/प्र.क्र.१८६/तांशि-४/ दि. ०५ जानेवारी २०२४

महाविद्यालयात जे विद्यार्थी शासन निर्णयानुसार न **डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाहभत्ता योजनेकरिता** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता पात्र ठरत आहेत व ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरून रजिस्ट्रेशन केलेले अशा विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे वरील संदर्भी शासन निर्णयान्वये वसतिगृहत निर्वाह भत्ता रकमेत वाढ करण्यात आलेली आहे याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**सदर योजनेकरिता खालील विद्यार्थी/विद्यार्थीनीची खालील अटी व शर्ती पूर्ण करणे अनिवार्य राहील.**

१) संबंधित योजनेच्या रक्कमेच्या मंजूरीकरिता विद्यार्थ्याचा प्रवेश केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश झालेला असावा.
२) कुटुंबातील सर्व सदस्यांचे मिळून उत्पन्न रूपये ८,००,०००/- (अक्षरी रू. आठ लाख मात्र) किंवा त्यापेक्षा कमी असावे.
३) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील वसतिगृहात प्रवेश न मिळालेला विद्यार्थी पात्र असेल.
४) पालकांचा सन २०२३-२४ मधील नोंदणीकृत मजूर प्रमाणपत्र किंवा अल्पभूधारक प्रमाण जे की सक्षम अधिकाऱ्यांच्या सहीने निर्गमित केलेले असावे.
५) विद्यार्थ्यांने भाडेकरारनामा (योग्य तो मुद्रांक शुल्क असलेला) अथवा वसतिगृह अधिक्षक यांचे प्रमाणपत्र ज्यामध्ये शैक्षणिक वर्षातील कालावधी प्रमाणे नमूद केलेला सादर करणे बंधनकारक राहील.
६) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील वर्गातील उपस्थिती प्रमाणपत्र
७) इतर सर्व कागदपत्रे.

| अनु. क्र. | भत्ता | रक्कम |
|---|---|---|
| १. | भोजन भत्ता | ३२,०००/- |
| २. | निवास भत्ता | २०,०००/- |
| ३. | निर्वाह भत्ता | ८,०००/- |
| | एकूण रक्कम | ६०,०००/- |

तरी सर्व विद्यार्थ्यांना सूचना की, जे विद्यार्थी वरील अटी व शर्तीची पूर्तता करू शकतील किंवा शकणार आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावी. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची व कागदपत्रांची प्रत महाविद्यालयात विनाविलंब सादर करावी.

B.R.A.C.TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७ Vishwakarma Institute of Technology

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत:- १) सर्व विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व विभागातील नोटीस बोर्डसाठी, २) महाविद्यालयातील सर्व नोटीस बोर्डकरिता- विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करणेकरिता.